क्रमांक :१५८७५/ब कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १४ ऑक्टोबर, २०२१

प्रेषक :

प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति :

विधानसभेचे सर्व सन्मा. सदस्य

विषय: मा. सदस्यांकडून तारांकित प्रश्नांच्या सूचना स्विकारण्याबाबत.......

महोदय/महोदया,

निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानसभेच्या **मंगळवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२१** रोजीपासून सुरु होणाऱ्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक व त्या दिवसाकरिता गटामध्ये समाविष्ट असलेले मा. मंत्री तसेच प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक इत्यादी नमूद असलेला चक्रानुक्रम पत्रक भाग-दोनद्वारे सर्व मा. सदस्यांना **गुरूवार, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१** रोजी **ई-मेलद्वारे** पाठविण्यात आला असून या सचिवालयाच्या **www.mls.org.in** या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देण्यात आला आहे. (प्रत सोबत जोडली आहे.)

**सदरहू अधिवेशनासाठी तारांकित प्रश्न सूचना गुरुवार, दिनांक २८ ऑक्टोबर, २०२१ रोजी सकाळी ११.०० वा. पासून QIS या संगणक प्रणालीवर ऑनलाईन (Online) पध्दतीने स्विकारण्यात येतील. मा.सदस्यांना प्रश्न सूचना स्विकारण्याच्या प्रथम दिनांकापासून केव्हाही तथापि, चक्रानुक्रमात नमूद केलेल्या विवक्षित उत्तराच्या दिनांकाकरिता प्रश्न सूचना स्विकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्रश्न सूचना या सचिवालयाकडे ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.**

कृपया याची नोंद घ्यावी.

आपला
प्रकाशचंद्र खोंदले
१२.१०.२०२१
(प्रकाशचंद्र खोंदले)
अवर सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**याची प्रत माहितीसाठी :-**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये,
विधान भवन, मुंबई- ४०० ०३२.

रोटा/एचबी २३५ [६००-१०-२०२१].

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

**गुरूवार , दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१ / आश्विन २२ शके, १९४३**

**महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२१ मधील तृतीय (हिवाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांचा चक्रानुक्रम**

**८१.** महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२१ मधील तृतीय (हिवाळी) अधिवेशनाकरिता माननीय मंत्रीमहोदयांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी माननीय अध्यक्षांनी पुढीलप्रमाणे दिवस नेमून दिले आहेत. ज्या दिनांकास प्रश्नाचे उत्तर हवे असेल तो दिनांक विवरणाच्या स्तंभ (३) मध्ये दर्शविलेला असून त्या दिवशी विचारावयाच्या प्रश्नांच्या सूचना या सचिवालयास मिळण्याचा अखेरचा दिनांक विवरणाच्या स्तंभ (४) मध्ये दर्शविलेला आहे. (प्रश्नाच्या सूचना मिळण्याच्या अखेरच्या दिनांकास सुट्टी असेल त्यावेळी त्या पूर्वीचा दिनांक दर्शविण्यात आला आहे.)

आगामी अधिवेशनासंबंधातील दिनदर्शिकेतील आखलेल्या कार्यक्रमात बदल झाल्यास त्यानुसार प्रस्तुत चक्रानुक्रमात बदल होईल. मा.सदस्यांना प्रश्नांच्या सूचना देण्यास मदत व्हावी म्हणून माननीय मंत्री आणि त्यांच्या अधिन असलेले विभाग यांचे विवरणपत्र सोबत जोडले आहे **(पृष्ठ क्रमांक ३ व ४)**

पहिल्या आठवडयातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट **सोमवार, दिनांक २९ नोव्हेंबर, २०२१** रोजी दुपारी ४.०० वाजता व त्यापुढील आठवडयातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे बॅलट त्यानंतरच्या प्रत्येक सोमवारी दुपारी ४.०० वाजता उप सचिव/अवर सचिव यांच्या दालनात घेण्यात येईल. याबाबतची माहिती पत्रक भाग दोनद्वारे स्वतंत्ररित्या मा.सदस्यांना कळविण्यात येईल. सदरहू बॅलटसाठी मा.सदस्यांना उपस्थित राहता येईल, **परंतु त्यांना प्रवास किंवा दैनिक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.**

### विवरणपत्र

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक (४) |
|---|---|---|---|---|
| एक | (१) उप मुख्यमंत्री<br>(२) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री<br>(३) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री<br>(४) ग्रामविकास व कामगार मंत्री<br>(५) वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री<br>(६) महिला व बालविकास मंत्री<br>(७) मृद व जलसंधारण मंत्री | | सोमवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२१<br>*सोमवार, दिनांक २० डिसेंबर, २०२१ | शुक्रवार, दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१<br>*गुरुवार, दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१ |
| दोन | (१) मुख्यमंत्री<br>(२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), मंत्री<br>(३) गृहनिर्माण मंत्री<br>(४) नगरविकास,सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री | | मंगळवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२१<br>मंगळवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२१<br>*मंगळवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२१ | बुधवार, दिनांक ३ नोव्हेंबर, २०२१<br>शुक्रवार, दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१<br>*गुरुवार , दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१ |

..२/-